| MHNS140015402022 | |
|---|---|

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३०३/२०२२ मधील नि क्र. १४३ खालील आदेश</u>**

**<u>श्री. मनोहर काशिनाथ ढगे वि श्री आबाजी नाना पवार</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ व कलम ७५ प्रमाणे कोर्ट कमिशनची नेमणूक करण्यासाठी केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जान्वये वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने तहसिलदार दिंडोरी यांच्याकडे वहिवाट केस क्र. ०९/२०२१ व आरटीएस रिव्हीजन क्र. ५०/२०२२ कामी झालेले आदेश बेकायदेशीर असून रद्दबातल आहे असा ठराव होवून मिळणेसाठी व निरंतर ताकिदी हुकूमासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादींनी जबाब व कैफियत दाखल करून वादी यांच्या मिळकतीत प्रतिवादी यांना जाण्यायेण्यासाठी पर्यायी रस्ता असून वहिवाट केस क्र ०९/२०२१ मध्ये महसुल न्यायालयात शाबीत केले आहे. मात्रा, सदर निकाल हा महसूल न्यायालयाने पाहणी न करता प्रतिवादीच्या बाजूने झुकते माप दिले आहे. वास्तविक पाहता वहिवाट केस क्र ०९/२०२१ मध्ये नमुद केलेला रस्ता हा वादी यांचा खाजगी रस्ता आहे. त्या रस्तावर प्रतिवादी यांचा काहीएक संबंध नाही. प्रतिवादी यांना त्यांच्या मिळकतीत जाण्यायेण्यासाठी पर्यायी रस्ता आहे. व सदर रस्त्याच्या प्रतिवादीने वापर व उपभोग घेत आहे. असे असतांना प्रतिवादी हे अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे वादीच्या मिळकतीसाठी असलेले खाजगी रस्ता हा त्यांचा वहिवाटीचा रस्ता

असल्याबाबत कथन करत आहे. अश्या परिस्थीतीत कोर्ट कमिशनरची नेमणूक झालयास प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादी यांनी त्यांचा जबाब दाखल केला असून त्यांनी वादींची कथने नाकारली आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादीने हेतुपुरस्सर दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी व गुंतागुंत निर्माण होण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादीच्या मिळकतीत जाण्यायेण्यासाठी पूर्वापारच वादीच्या क्षेत्रातून वहिवाट रस्ता होता व आहे. त्यात वादीने अडथळा निर्माण केल्यामुळे सदर प्रतिवादींनी तहसिलदार दिंडोरी यांच्या न्यायालयात वहिवाट केस क्र. ०९/२०२१ दाखल केले होते. सदरच्या वहिवाट केसच्या कामी तहसिलदार दिंडोरी दि.२६.०६.२०२१ रोजी स्थळ निरिक्षण पंचनामा केला आहे. त्यानुसार वादीच्या क्षेत्रातून असणारा वहिवाट रस्ता दिसून आला आहे. वास्तविक पाहता मामलेदार कोर्ट ॲक्टच्या कलम ५ अन्वये केस दाखल झाल्यानंतर तहसिलदार यांनी अर्जदाराने नमुद केलेल्या वहिवाटी रस्ता व त्यातील अडथळा याची पाहणी करण्याची तरतुद आहे. त्यात पर्यायी रस्त्याची पाहणी करण्याची कोणतीही तरतूद नाही. वादीचा प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करणे योग्य व न्यायोचित ठरेल.

**४.** अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत दाव्यात विनंती कलमात १८अ मध्ये तहसिलदार दिंडोरी यांच्याकडील वहिवाट केस क्र. ०९/२०२१ दि.०६.०९.२०२२ रोजी झालेला आदेश व उपजिल्हाध्किारी भूसंपादन भाग दिंडोरी/उपविभागीय अधिकारी उपविभाग दिंडोरी यांच्याकडील आरटीएस रिव्हीजन प्रमाणे ५०/२०२२ दि.०५.०९.२०२२ रोजी झालेले आदेश बेकायदेशीर असून रद्दबातल आहे असा ठराव होवून मागितला आहे म्हणजेच वादीला तहसिलदार दिंडोरी यांनी प्रतिवादी यांना वादीचा क्षेत्रातून

वहिवाट रस्ता असल्याचे सदर निकालान्वये सांगितलेले मान्य नाही. या ठिकाणी ही बाब नमूद करणे आवश्यक आहे की, प्रस्तुत प्रकरणात निघालेल्या मुद्दयांचे अवलोकन केले असता मुद्दा क्र ५ व मुद्दा क्र ७ याबाबत वादीला पुरावा देणे आवश्यक आहे.मात्र कोर्ट कमिशनरची नेमणुक करून वादीला प्रतिवादी यांना पर्यायी रस्ता आहे की, नाही तसेच वहिवाट केस क्र. ०९/२०२१ मधील रस्ता हा वादींचा खाजगी रस्ता आहे, हे न्यायालयासमोर वादी कोर्ट कमिशनच्या माध्यमातून आणू इच्छित आहे. परंतु वादी सदर बाब सिध्द न करता न्यायालयामार्फत पुरावा गोळा करू पाहत आहे. सबब, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे पुरावा जमा करण्याच्या उद्देशाने कोर्ट कमिशनरची नेमणुक करता येत नाही. सबब वरील चर्चेअंती कायदेशीर तरतुदींच्या अनुषंगाने मी खालील आदेश पारित करत आहे.

**:: आदेश ::**

१. वादीचा नि.क्र. १४३ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

PANDIT ASHWINI ANIL

Digitally signed by PANDIT ASHWINI ANIL
Date: 2025.11.15 15:37:21 +0530

दिनांक १४/११/२०२५
दिंडोरी

( अ.अ.पंडीत )
सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
दिंडोरी.